वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. ६ जुलै २०२५ पाने ४ किंमत ३

# एका सावकाराने व्याजाची लक्ष्मण रेखा पार केल्याने झालेल्या त्रासातून एकाची आत्महत्या

## सत्ताधारी पक्षाच्या एक पदाधिकारी व त्याच्या पत्नीच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या


### पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल, एकाला अटक केल्याची प्राथमिक माहिती

**विविध पक्षाच्या युवा नेत्यांमध्ये पदे घ्यायचे आणि त्याच्याआड गुटखा, मटका, सावकारकी, वाळू, पत्त्याचे क्लब सह इतर अवैध धंदे खुलेआम करायण्याचा एक नवीन ट्रेंड या युवक पुढाऱ्यांमध्ये सुरू झाला, याचा नाहक त्रास सामान्य जनतेला**

Email.- dailydivyawarta@Gmail.com Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता





बीड, (दिव्य न्युज):- खाजगी सावकरांची नावे चिठ्ठत लिहून एका तरूण कापड व्यावसायिकाने राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी काळा हनुमान ठाणा पेठ बीड भागात उघडकीस आली. सदरील तरूणाने लिहिलेल्या चिठ्ठीत काही राजकीय पक्षाशी संबंधीत पदाधिकाऱ्यांकडून आणि काही फायनान्सवाल्या सावकारांकडून पैसे घेतल्याचा उल्लेख असून त्यांच्याकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून हे पाऊल उचलत असल्याचे चिठ्ठीत नमुद असल्याचे समजते. याप्रकरणी दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. बीड शहरातील काळा हनुमान ठाणा, पेठ बीड भागातील

पान २ वर

## ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलमधील घटना

# विजय पवारवर ॲट्रॉसिटी अन् बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी अजून एक गुन्हा दाखल!



बीड , (दिव्य न्युज):- उमाकिरण बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी अटक असलेला स्वयंघोषित शिक्षणतज्ञ विजय पवार याच्यावर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दुसरा बाल लैंगिक अत्याचाराचा पोक्सो आणि ॲट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हा दाखल झाला आहे. यामुळे विजय पवार याचे पाय आणखी खोलात गेले आहेत. याबाबत कालच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पोलीस प्रशासनाला चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याची सूचना केली होती. अन् आज

▶▶ पान २ वर

### प्रिन्सीपल रश्मी अरोरा यांनी हॉलतिकिट रोखले होते

पिडित विद्यार्थीनीच्या पालकांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सन २०२२ मध्ये दिवाळीच्या परिक्षेचे हॉलतिकिट मिळाले नाही म्हणून माझी मुलगी प्रिन्सीपल रश्मी अरोरा यांच्या कॅबिनमध्ये गेली, तेंव्हा तुला हॉलतिकिट मिळणार नाही, तु तुझ्या पालकांना घेवून ये असे म्हणत परिक्षेचे हॉलतिकिट सुध्दा दिले नव्हते. एवढेच नव्हे तर अरोरा मॅडम व विजय पवार यांनी माझ्या सासऱ्याशी अरेरावी करत हाकलून दिले होते. येथून पुढे त्यांना माझ्या शाळेमध्ये प्रवेश देणार नाही असे सुध्दा सांगितल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# बीडमधील उर्दु शाळेच्या संस्था चालकाचा संपादकावर प्राणघातक हल्ला

## संस्थेच्या विरूध्द बातमी का छापली या रागाच्या भरात संघर्ष चे संपादक खमरूल इमानवर भ्याड हल्ला

## पोलिसात तक्रार दाखल, त्या उडमठ आणि मुजोरपणा करणाऱ्या संस्था चालकाला पोलिसांनी चांगला धडा शिकवावा

### अनेक संस्था चालकांनी आप आपले गैर कामे बाहेर निघू नये म्हणून शाळेत गुंडांची टोळी कायमच केली



बीड, (दिव्य न्युज):- संस्थेच्या शाळांविरुध्द बातम्या का छापल्या? असे म्हणत दै.बीड संघर्षचे संपादक खमरुल इमान यांच्यावर संस्थाचालक सईद मिर्झा बेग व शिक्षक कागजी एकरार यांनी हल्ला केल्याची घटना काल रात्री झमझम कॉलनीतील कौसर चौकात घडली. याप्रकरणी संपादक खमरुल इमान यांच्या तकारीवरून संस्थाचालक सईद मिर्झा अन्वर बेग व शिक्षक कागजी एकरार अहेमद असरार अहेमद (दोघे रा.कागदी वेस, बीड) यांच्याविरुध्द शहर पोलिस ठाण्यात एनसी दाखल झाली आहे. दरम्यान संपादकावर झालेल्या हल्ला प्रकरणाचा पत्रकार संघटनांकडून निषेध व्यक्त केला जात असून उद्या सर्व पत्रकार पोलिस अधिक्षकांना भेटणार आहेत.

बीड येथील दै.बीड संघर्षचे संपादक मोहम्मद खमरुल इमान खान जफर खान नाझ हे दि.५ जुन रोजी रात्री सव्वा आकरा

▶▶ पान २ वर

### “पीआय बल्लाळ साहेब,संपादकांनी तक्रार देवूनही गुन्हा का दाखल नाही?

बीड संघर्षचे संपादक खमरुल इमान यांच्यावर बातम्या छापल्याच्या रागातून शिक्षण संस्थाचालकाने हल्ला केला. याप्रकरणात स्वत: संपादकांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. मात्र त्यामध्ये गुन्हा दाखल करण्याच्या ऐवजी शहर पोलिसांनी केवळ एनसी दाखल केली. पीआय बल्लाळ साहेब, हे कोणत्या नियमात बसतं. गुन्हा दाखल करण्याऐवजी एनसी दाखल करून उलट ज्यांनी खमरुल इमान यांना मारहाण केली त्यांनीच खमरुल इमान यांच्याविरुध्द दबाव टाकण्यासाठी एनसी दाखल केली आणि पोलिसांनी सुध्दा ती दाखल करून घेतली. एखाद्याने तक्रार दिल्यानंतर आधी त्या तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल होतो. मात्र शहर ठाण्यात त्याविरुध्द घडलंय ते कोणत्या आधारे?

▶▶ पान २ वर

# सालारजंग जमीन प्रकरणात नवीन ट्विस्ट

## जमीन भेट करणारे वंशजच नसल्याचा दावा



औरंगाबाद, (दिव्य न्युज):- निजामाचे तत्कालीन पंतप्रधान सालारजंग यांच्या मूळ मालकीची, औरंगाबाद शहरातील बागशेरजंग-दाऊदपूर येथील कोटच्यवधी रुपयांची जमीन खासदार संदीपान भुमरे आणि आमदार विलास भुमरे यांचे वाहनचालक जावेद रसूल शेख यास बक्षीसपत्र म्हणून देण्यात आल्याचा आरोप ड. मुजाहिद खान यांनी केला आहे.

ही जमीन आपली असल्याचा दावा केल्याने संदीपान भुमरे यांच्या नावाने धमकाविण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. तशी तक्रार त्यांनी पोलिसांकडे केली आहे. दरम्यान, या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक गुन्हे

▶▶ पान २ वर




९ तासाच्या चौकशीत संदिपान भुमरेंच्या चालकाची उडवाउडवीची उत्तरे

१५० कोटींच्या जमीन गिफ्ट प्रकरणी पाय खोलात?

# ज्ञानराधा घोटाळ्यात मुख्यमंत्री फडणवीसांनी लक्ष घातले


## सोमवारी बैठक, उपमुख्यमंत्री पवार, शिंदेंचीही उपस्थिती




बीड,(दिव्य न्युज):- पावणेपाच लाख ठेवीदारांची तीन हजार ७१५ कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या ज्ञानराधा मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी प्रकरणात आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घातले आहे. आतापर्यंतचा तपास, जप्त केलेल्या मालमत्ता आणि यातून पैसा उभा करण्याचे प्रयत्न आदी महत्त्वाच्या मुद्द्यांवर सोमवारी (ता. सात) विधिमंडळात बैठक होणार आहे.

बीड, जालना, परभणी, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, मुंबई, इंदूर (मध्य प्रदेश) आदी ठिकाणी ५३ शाखा असणाऱ्या ज्ञानराधाचे मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे आर्थिक व्यवहार दोन वर्षांपूर्वी ठप्प झाले. सुरवातीचे सहा महिने अध्यक्ष सुरेश कुटे याने कुटे समूहात परदेशी

▶▶ पान २ वर






# परळीत अघोरी अंधश्रद्धेचा प्रकार उघड

## भर रस्त्यात हळद, कुंकू, लिंबू टाकून कोंबड्याचा दिला बळी

परळी, (दिव्य न्युज):- परळी शहरात सप्तश्रृंगी देवीच्या मूर्तीस्थापनेनिमित्त मिरवणूक काढण्यात आली असताना, या धार्मिक मिरवणुकीनंतर अघोरी प्रथा व जादूटोणासारखे कृत्य झाल्याचा आरोप करत अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.बालाजी रानबा ढगे (वय ४१, रा. रामनगर, परळी वैजनाथ) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक ४ जुलै २०२५ रोजी दुपारी १२.३० ते १ वाजण्याच्या सुमारास परळी शहरातील लक्ष्मी टॉवर परिसरात

▶▶ पान २ वर

# रेशन दुकानात साड्या पडून अन् मशीन मधून ऑप्शन गायब झाल्याने वाटप बंद!

बीड, (दिव्य न्युज):- अंत्योदय शिधा पत्रिका धारकांना वर्षातून एकदा साडी दिली जाते साड्यांचे वितरण वितरण राज्य शासनाचे सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत करण्यात येत असून शिधापत्रिका धारकास प्रतिवर्षी एक साडी मोफत वाटप केली जाते मात्र जून पासून राज्यातील सर्वच इ-पॉस मशीन वरून साडी वितरणाचा ऑप्शन काढून घेतला आहे या कारणामुळे लाभार्थ्यांना साड्या वाटप करताना येत नाही राज्याच्या एकात्मिक व शोशत वस्त्र उद्योग धोरण २००३ मध्ये जाहीर करण्यात आले होते.

गाजावाजा तर केला पण वाटपात अडथळा मोठा असे चित्र दिसत आहे. अंतोदय शिधापत्रिका धारक कुटुंबांना वस्त्र उद्योग विभागामार्फत यंत्र मार्गावर विणलेली प्रतिकुटुंब एका साडीचे वाटप करण्याची योजना सन २००३ मध्ये सुरू करण्यात आली होती या योजनेच्या कालावधी पाच वर्षाचा निश्चित करण्यात आला होता महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ नवी मुंबई ही नोडल संस्था म्हणून नेमण्यात आली आहे यंत्रमाग सहकारी संस्था सक्षम व मध्यम उद्योग नोंदणी कृत घटक अंतर्गत यांच्याकडून या साड्यांचे उत्पादन केले जातं बीड जिल्ह्यातील अंत्योदय कार्डधारकांसाठी ३३४०४० एवढ्या साड्या जिल्हा पुरवठा विभागास राज्य संस्था कडून प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी २१ हजार ३७३ साड्यांचे वाटप करण्यात आले आहे परंतु ईपास मशीनवर साडी वितळ ऑप्शन दिसत नसल्याने जवळपास १२००० च्या वर साड्या पडून आहे शासनातर्फे येणाऱ्या साड्यांचे गठ्ठे व रास्त भाव दुकानात वितरण गाठायचे नोंद सुद्धा ऑनलाइन पद्धतीने ठेवली जात आहे साड्यांचे वाटप मी पास मशीनद्वारे करावे अशा सूचना पुरवठा विभागास आहे मात्र जून महिन्यापासून इ पास मशीन वरून साडी वितरणाचा ऑप्शन दिसत नसल्याने साडी वितरणाचे काम थांबले असल्याची माहिती समोर आली आहे.




पान ४ वरून

## उमाकिरण संकुलात

घडलेल्या प्रकाराकडे पोलिसांचे लक्ष वेधले. त्याही पीडितेची तक्रार तात्काळ नोंदवून कडक कारवाई करा, असे निर्देश यावेळी चाकणकरांनी दिले आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी शनिवारी येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी त्या बोलत होत्या. पत्रकार परिषद घेण्यापुर्वी त्यांनी पिडीत विद्यार्थिनीची आणि तिच्या कुटूंबाची भेट घेतली. मानसिक आधार देत दोषीवर कडक कारवाई करण्यात येणार आहे असे आश्वासनही त्यांनी पिडित विद्यार्थीनीच्या कुटूंबियांना दिले आहे. आरोपी प्रशांत खाटोकर आणि शिकवणी वर्गाचे संचालक विजय पवार यांना बीडमधून बाहेर पडण्यासाठी मदत करणारे अजय नारायण बोदरे यांनाही तपासाकामी पोलिसांनी नोटीस दिली आहे, संचालक विजय पवार यांच्या संस्थेत २०२३ मध्ये दोन विद्यार्थिनीलाही त्रास देण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यावेळीस संबंधित विद्यार्थीनीने आणि त्यांच्या पालकांनी जि.प. सीईओ आणि शिक्षण विभागाकडे तक्रार ही केली होती. मात्र ही तक्रार त्यांनी पोलिसांकडे केली असती तर त्यावेळेस त्यांनी ती गांभीर्याने घेतली असती आणि आता जो उमाकिरण संकुलात प्रकार घडला तो घडला नसता असेही चाकणकर यांनी सांगितले. २०२३ मध्ये त्रास दिलेल्या दोन विद्यार्थीनीच्या जवाबावरून पोलिसांकडे गुन्हा नोंद होईलच. बीड शहरातील जेवढे शिकवणी वर्ग आहेत त्या सर्व शिकवणी वर्गामध्ये विद्यार्थी पालक समिती, आयसीटी कमिटी, सीसीटिव्ही व महिला कर्मचारी आहेत की नाहीत? या बाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या आहेत. उमाकिरण संकुलामधील सीसीटिव्ही फुटेज, लॅपटॉप आणि मोबाईल ही सर्व उपकरणे फॉरेन्सिक लॅबकडे पाठविण्यात आलेली आहेत. उमाकिरणच्या तपासाबाबत जिल्हा महिला बालकल्याणचे अधिकारीही लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे अशा प्रकारची विकृत मानसिकतेचे गुन्हेगार कोणत्याही परिस्थितीमध्ये कायद्याच्या कसाट्यातून सुटणार नाहीत याची गांभीर्याने दखल महिला आयोग घेत आहे असेही यावेळी चाकणकर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, सहाय्यक पोलिस अधीक्षक कमलेश मिना, डीवायएसपी पुजा पवार, एपीआय वर्षा व्हागाडे, पीएसआय पल्लवी जाधव यांच्यासह इतर अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## आर्किटेक शेख आर्शद

इस्लाम आणि मानवता धर्म यावर काम करतो आहे. शिवाय आर्किटेक शेख अर्शद हे सुद्धा प्रबोधनाचे काम करीत आहेत. येणार्या काळामध्ये मुस्लिम तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत मग त्यात धार्मिक असतील, व्यावसायिक असतील, शैक्षणिक असतील अशा आव्हानांना कश्या पद्धतीने तोंड द्यायचे आणि त्यातून पुढे कसे जायचे असा मौलिक सल्ला व प्रबोधन या माध्यमातून करत आहेत. दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी जावून ते प्रबोधन करीत आहेत. त्यांनी स्वतः यासाठी पुढाकार घेवून इस्लाम द अल्टिमेट आर्ट ऑफ लिव्हिंग या पुस्तकाची निर्मिती करुन यावर अनेक प्रश्नांवर प्रकाशझोत टाकला आहे. हे पुस्तक त्यांनी देशाचे जाणते व अनुभवी नेते जे स्वत धर्मनिरपेक्षतेचे राजकारण आणि समाजकारण करीत आहेत. अशा नेतृत्वाला त्यांनी हे पुस्तक भेट दिले आहे. हे पुस्तक पाहिल्यानंतर खा.शरदचंद्र पवार यांनी पुस्तकातील माहिती संक्षिप्त स्वरुपात जाणून घेतला. माहिती जाणून घेतल्यानंतर शरदचंद्र पवार यांनी आर्किटेक शेख अर्शद यांचे कौतुक केले.

## जिंतूर तालुक्यातील

तांड्याचे मुरलीधर पवार यांच्याशी झाला होता. दांपत्याला एक मुलगा एक मुलगी असे दोन अपत्ये आहेत. मृत्यूबाबत संशय व्यक्त करत आरती यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने रुग्णालयात जमा झाले. पती व सासरच्या लोकांना अटक होईपर्यंत शवविच्छेदन होऊ देणार नाही, असा पवित्रा त्यांनी घेतला. चारठाणा येथील पोलिस उपनिरीक्षक सुनील अंधारे, पीएसआय विठ्ठल राठोड यांच्यासह परभणी स्थानिक गुन्हे शाखेचे हवालदार जिया खान पठाण, माणिक डूकरे, चौधरी ,वासलवार, मधुकर राठोड,घोगरे, घुगे आदींनी घटनास्थळी पोहोचून नातेवाईकांना शांत करण्याचा प्रयत्न केला मात्र नातेवाईक आडून बसल्याने सकाळी १० ते रात्री ७ वाजे पर्यंत रुग्णालयात नातेवाईक ठाण मांडून बसले होते शेवटी जिंतूरचे पोलीस निरीक्षक श्री गजेंद्र सरोदे ह्यांनी नातेवाईकांची समजुत घातल्या नंतर रात्री उशीरा माहेरच्या मंडळींनी शवविच्छेद

## विजय पवार, प्रशांत

३० जणांचे जबाब नोंदवले असून पीडितेच्या मैत्रिणी, कुटुंबीय, क्लासमधील काही जणांचा समावेश आहे. पोलिसांनी खाटोकरची दुचाकी जप्त केली असून दोघांचे मोबाइल, टॅब, लॅपटॉपही जप्त केले आहेत. तर क्लासमध्ये ४० सीसीटीव्ही कॅमेरे असून त्यांचे डीव्हीआर जप्त केले आहेत. पोलिसांनी या घटनेतील लॅपटॉप, मोबाईल, सीसीटीव्ही फुटेज फॉरेन्सिक लॅबला तपासणीसाठी पाठवले आहे. तसेच ३० पेक्षा अधिक जणांचे जबाब देखील नोंदवले आहेत. काल प्रशांत खाटोकर व विजय पवार यांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू असून, पुढील तपासासाठी पोलिसांकडून पुरावे संकलनाची प्रक्रिया सुरू आहे. बीडमधील या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. उमाकिरण शैक्षणिक संकुलात नीटची तयारी करणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थीनीचा लैंगिक छळ केल्यावरुन संचालक विजय पवार आणि शिक्षक प्रशांत खाटोकर या दोघांवर पोक्सोनुसार गुन्हा नोंद आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षकांकडून शिवाजीनगर ठाण्याचे पोलिस निरीक्षक किशोर पवार यांच्याकडे सोपविण्यात आला. बीड शहर पोलिस ठाण्याच्या कोठडीत रात्र घालविलेल्या पवार, खाटोकरला शिवाजी नगर पोलिस ठाण्यात आणण्यात आले. इथे दोघांचे मोबाईल ताब्यात घेतले असून त्यांचा सीडीआर तपासला जात आहे. तसेच इंटरनेटचा वापर करुन काही कृत्य केले का, याबाबत तपास अधिकाऱ्यांनी इंटरनेट वापरकर्त्यांनाही पत्र दिले आहे.

## ऐतिहासिक कारंजा

देखभाल आणि सुरक्षेकरिता बीड नगर परिषदे चा प्रत्येकी किमान एक-एक कर्मचारी दिवस-रात्र कायमस्वरूपी नियुक्त करणे ही कामे युद्ध पातळीवर करणे आवश्यक आहे. असे बीड चे तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासन विभागाचे अधिकारी संभाजी वाघमारे आणि बीड नगर परिषद कार्यालयात उपमुख्याधिकारी सम्राट कदम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच या ऐतिहासिक वास्तूसाठी नागरिकांनी पुढे येऊन ५ कामे स्वतः केली आहेत. इथे सिमेंटचे १० बाकडे ठेवले, २ इलेक्ट्रिकल मोटारी लावल्या, रंगबिरंगी लाइट्स लावून सुरू केल्या, पाण्याचे फवारे सुरू केले आणि इतिहासात प्रथमच कारंजा टॉवर लिहिलेले नामफलक ही लावण्यात आले आहे. प्रशासनिक अधिकाऱ्यांना आता फक्त उरलेली १२ कामे करावी लागणार आहेत. ती कामे तिन्ही जबाबदार अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन पूर्ण केली तर या ऐतिहासिक वास्तूचे जतन व संगोपन चांगले होईल. अन्यथा या ऐतिहासिक वास्तुची दुर्दशा दूर करण्याकरिता आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल असा इशाराही ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेश राव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी निवेदनातून दिला आहे.

पान १ वरून

## एका सावकाराने व्याजाची

राम दिलीप फटाले (वय ४२) यांनी राहत्या घरात गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली. राम फटाले हे कपड्याचा व्यवसाय करत होते. जिल्ह्यातील आठवडी बाजारातही ते दुकान लावून कपडे विक्री करायचे. कापड व्यावसायासाठी त्यांनी काही सावकारांकडून कर्ज घेतले होते. त्या सावकारांना वेळेवर व्याज देवूनही त्यांच्याकडून सातत्याने मानसिक त्रास दिला जात होता. त्यामुळेच त्यांनी आत्महत्येचे पाऊल उचलले असे नातेवाईकांनी सांगितले. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रूग्णालयात आणण्यात आला होता. जोपर्यंत संबंधित सावकारांविरुध्द कारवाई होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका नातेवाईकांनी घेतली होती. अखेर दुपारी उशिरा नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. दरम्यान मयत राम फटाले यांनी आत्महत्यापुर्वी सहा पानाची एक चिठ्ठी लिहून ठेवल्याचे समजते. त्यामध्ये काही राजकीय पक्षाशी संबंधीत पदाधिकाऱ्यांकडून पैसे घेतल्याचा तसेच काही फायसान्सवाल्या सावकारांकडूनही रक्कम घेतल्याचा उल्लेख असल्याचे सुत्रांनी सांगितले.

## विजय पवारवर

गुन्हा दाखल झाल्याचे उघडकीस आले आहे. अशा प्रकारातून ज्या मुलींना जावा लागले आहे त्यांनी पुढे येऊन तक्रार करण्याचेही चाकणकर यांनी आवाहन केले होते.

आरोपीला त्याच्या निच कृत्याची शिक्षा मिळावी यासाठी पालकांनी पुढे येऊन तक्रार करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. उमाकिरण संकुलातील शिक्षकांनीच अल्पवयीन विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर या घटनेने राज्यात खळबळ उडाली आहे. पुन्हा एकदा बीड जिल्हा राज्यात चर्चेत आला आहे. याचे सर्वत्र पडसाद उमटत असल्याने पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवून आरोपी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांना अटक केली आहे. हे दोघेही कोठडीत आहेत. या प्रकरणीच काल शनिवारी (दि.५) राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी बीड येथे भेट देऊन पीडिता आणि पालकांची भेट घेतली त्यांच्याशी चर्चा करुन धीर दिला. यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली यावेळी त्यांनी २०२३ मध्येही विजय पवार विरोधात अशाच प्रकारची जिल्हापरिषदेचे सीईओ यांच्याकडे तक्रार आली होती पण तेंव्हा कारवाई का झाली नाही असा प्रश्न उपस्थित केला होता. या प्रकरणी पोलिसांनी चौकशी करुन यात तथ्य असल्यास गुन्हा दाखल करण्याच्या सूचना दिल्याचे सांगितले होते. काल पोलिसांनी या प्रकरणी चौकशी करुन आता दुसरा बाल लैंगिक अत्याचार पोक्सो आणि ट्रॉसिटी क्ट नुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. तर एकच नव्हे तर अनेक विद्यार्थीनींचा या विजय पवार कडून छळ झाल्याची शंका आहे ती खरी ठरताना दिसत आहे. परंतु अशा निच वृत्ती आणि कृत्याची शिक्षा मिळावी यासाठी ज्या मुलींना या प्रकारातून जावे लागले त्या पीडिता आणि पालकांनी पुढे येऊन तक्रार करण्याचेही चाकणकर यांनी आवाहन केले होते यानंतर हा गुन्हा दाखल झाला आहे. यामुळे नाकाने वांगे सोलणाऱ्या विजय पवारचा खरा चेहरा उघडा पडला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर एकच नाही तर आणखी मुलींचा या आरोपींनी छळ केलेला असेल ही शंका खरी वाटत आहे.

## बीडमधील उर्दु शाळेच्या

वाजण्याच्या सुमारास घरी असतांना त्यांना कागजी एकरार यांनी फोन करून सईदभाई, तुम्हाला बोलणार आहेत, त्यांच्याशी बोला असे म्हणताच खमरुल इमान यांनी मला कोणाशी बोलायचे नाही असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर खमरुल इमान हे घराजवळील कौसर चौक येथून जात असतांना कागजी एकरार यांनी मला आवाज देवून बोलावून घेतले व त्याठिकाणी असलेल्या संस्था चालक सईस मिर्झा अन्वर बेग यांनी माझ्या शाळेच्या विरोधात बीड संघर्ष पेपरमध्ये बातम्या का छापतो असे म्हणत शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. माझ्या शाळेबद्दल माफिनामा छाप असे म्हणत सईद मिर्झा अन्वर बेग व कागजी एकरार यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी संपादक खमरुल इमान यांच्या तक्रारविरुध्द सईद मिर्झा अन्वर बेग व कागजी एकरार या दोघांविरुध्द एनसी दाखल करण्यात आली आहे.

## पीआय बल्लाळ साहेब

असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे. याप्रकरणात खरं तर पोलिसांनी बीड संघर्ष या पेपरचे मागील काही अंक तपासावेत त्यामध्ये संबंधीत शाळेच्या विरुध्द बातम्या आहेत का आणि त्यावरूनच ही मारहाण झाली का? हे तपासून पत्रकार संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करायला पाहिजे होता. मात्र पोलिसांनी यामध्ये बोटचेपी भूमिका का घेतली? असा प्रश्न उपस्थित होवू लागला आहे.

## सालारजंग जमीन

शाखा तपास करीत आहे. या प्रकरणात वाहनचालक जावेद यांचा जबाब नोंदविण्यात आला असून, त्यांना काही कागदपत्रे सादर करावीत, अशा सूचना दिल्या असल्याचे पोलिस निरीक्षक संभाजी पवार यांनी 'मटा'शी बोलताना सांगितले. तसेच अद्याप या प्रकरणात गुन्हा घडला आहे काय, याबाबत कोणतेही निष्कर्ष काढलेले नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

शहरातील बागशेरजंग, दाऊदपुरा येथील नऊ एकरचा 'फेर' चेनमल पन्नालाला कोठारी व त्यांच्या परिवाराच्या नावे आहे. तर जमिनीवर सालारजंगचे वारस म्हणून मीर महेमूद अलीखान व अन्य काही जणांचा दावा आहे. या प्रकरणाचा खटला लढण्यासाठी मीर महेमूद यांनी परभणी येथील ड. मुजाहिद खान यांना वकीलपत्र दिले आहे. 'खटला लढण्यासाठी पैसे नाहीत. जमिनीच्या 'पीआर कार्ड'वर नाव लागल्यानंतर त्यातील तीन एकर जमीन देऊ, असे सांगत मीर महेमूद यांनी २७ जानेवारी, २०१५ रोजी नऊपैकी तीन एकर जमीन प्रति एकर ९० लाख ४५ हजार रुपये या प्रमाणे 'ग्रीमेट टू सेल' नोटरी करून दिले, तसेच काही रक्कमदेखील घेतली,' असे ड. मुजाहिद खान यांनी तक्रारीत नमूद केले आहे. तसेच खटला लढण्यासाठी महेमूद यांनी वेळोवेळी रक्कम घेऊन त्या बदल्यात 'ग्रीमेंट टू सेल' रजिस्टर्ड जीपीए व 'हिबानामा' करून दिला आहे. पैसा व वेळ खर्च करून खटला लढलो आणि अखेर ३० जानेवारी, २०२३ रोजी या जमिनीच्या 'पीआर कार्ड'वर मीर महेमूद अली खान यांचे नाव लागले. त्यानंतर ड. मुजाहिद हे बक्षीसपत्राची जमीन पाहण्यासाठी गेले असता, वाहनचालक जावेद रसुल शेख यांच्या नावे या जमिनीचा हिबानामा करण्यात आल्याचे त्यांना समजले.भुमरे यांनी ही जमीन विकत घेतली आहे. इकडे फिरकूही नको, या जमिनीच्या भानगडीत पडू नको, अन्यथा तुझीही कबर खणू, असे धमकावल्याची तक्रार ॲड. खान यांनी पोलिसांमध्ये केली. जावेद यांच्याकडील करारनामा हा ९ फेब्रुवारी, २०२३ रोजी केल्याचे दिसून आल्याचेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

'चालकाच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंध नाही'

दरम्यान, या तक्रारीच्या अनुषंगाने माध्यमांशी बोलताना पैठणचे आमदार विलास संदीपान भुमरे म्हणाले, की आमचा वाहनचालक असेल, तर गाडी चालविणे हेच त्याचे काम. त्याच्या व्यक्तिगत आयुष्याशी आमचा संबंध नाही. त्याने काय करावे, हे माझ्या हातात नाही.

शेतकऱ्यांना दिलासा! आता खतांच्या उपलब्धतेची माहिती मिळणार ब्लॉगवर, विनामूल्य सेवा, 'इथे' दिसणार माहिती

मला जमीन गिफ्ट केलीय- ड्रायव्हर जावेद रशीद शेख

माझ्या वडिलांचे नवाबंचे कौटुंबिक संबंध आहेत. आम्ही हैदराबादला जात होतो, ते संभाजीनगरला आले तर आमच्याकडे थांबत होते. यामुळे आमचे कौटुंबिक संबंध आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांचं कुणी नाही, येथे त्यांची काम मी करुन दिली. माझं वय आता ३८ आहे, मी लहानपणापासून त्यांच्या सहवासात लहानसा मोठा झाला.यामुळे त्यांनी मला जमीन गिफ्ट केली आहे. खासदार संदिपान भुमरे आमदार विलास भुमरे यांचा या प्रकरणाशी कुठलाही संबंध नाही. फक्त मी भुमरे यांच्याकडे कामाला असल्यामुळे जमीन घेतल्याचा बाऊ केला गेला.

## ज्ञानराधा घोटाळ्यात

गुंतवणुकीच्या माध्यमातून येणाऱ्या पैशातून ठेवीदारांचे पैसे देऊ, अशी आश्वासने दिली. मात्र, ठेवीदारांचा भ्रमनिरास झाला. त्यामुळे त्याच्यासह संचालकांवर फसवणुकीच्या गुन्ह्यांचे सत्र सुरू झाले. आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासात पावणेपाच लाख ठेवीदार व खातेदारांच्या तीन हजार ७१५ कोटी रुपयांच्या ठेवी असल्याचे समोर आले. आर्थिक गुन्हे शाखेने ८० स्थावर, आठ जंगम मालमत्ता जप्त करून कुटेसह इतरांची ३५ बँक खाती गोठवली. दरम्यान, या प्रकरणात अध्यक्ष सुरेश कुटे, आशिष पाटोदकर, यशवंत कुलकर्णी कोठडीत असून अर्चना कुटे फरार आहेत.

काय आहे सद्यःस्थिती

जिल्ह्यात दाखल सर्व गुन्ह्यांचा एकत्रित तपास बीड पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने केला. या शाखेने साधारण ८० मालमत्ता जप्त केल्या असून,एमपीआयडीअंतर्गत या मालमत्तांवर शासनाची मालकी नोंदविण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी म्हणून शासनाने बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांची नेमणूक केली आहे, तर केंद्रीय सहकार विभागाने ज्ञानराधावर जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) समृत जाधव यांची नियुक्ती केली आहे. त्यांनी पहिल्या टप्प्यात सर्व शाखांची तपासणी करून ठेवी व कर्जाची कागदपत्रे ताब्यात घेतली. सोने तारण कर्जवसुलीची प्रक्रिया सुरू केली. आता शासनाने आर्थिक गुन्हे शाखेकडील तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविला आहे. दरम्यान, ठेवीदार संघर्ष समितीची आंदोलने सुरु असून आमदार सुरेश धस यांनी अधिवेशनात हा मुद्दा जोरदारपणे लावून धरला होता. त्यातून बैठकीचे पाऊल उचलण्यात आले आहे.

ईडीने जप्त केलेल्या मालमत्ता सोडविण्यासाठी प्रयत्न

या गुन्ह्याचा तपास करताना सुरेश कुटेने ज्ञानराधाचा पैसा कुटे समूहात आणि परदेशातदेखील वळविल्याचे समोर आल्याने सक्तवसुली संचालनायलाने (ईडी) याचा तपास करताना ज्ञानराधाचा अध्यक्ष सुरेश कुटे व संबंधितांच्या १६२१ कोटी रुपयांच्या मालमत्तांवर टाच आणली. आता या मालमत्ता पुन्हा ज्ञानराधाकडे हस्तांतरित करण्यासंदर्भात पीएमएलए कोर्टात अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

बैठकीला असेल यांची उपस्थिती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधीमंडळात होणाऱ्या बैठकीला उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार सुरेश धस, आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह, सहकार आयुक्त तसेच संबंधीत अधिकारी उपस्थित असतील.

## भर रस्त्यात हळद,

देवीच्या मिरवणुकी नंतर दिपक देशमुख (रा. गणेशपार, परळी) यांनी नागलीची पाने, हळद, कुंकू, लिंबू रस्त्यावर टाकून कोंबड्याची बळी देत रक्त रस्त्याच्या मधोमध सांडले. या अघोरी प्रकारामुळे परिसरात भीतीचे व अंधश्रद्धेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे ढगे यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे.

या घटनेच्या वेळी ढगे यांच्यासोबत अं.नि.स.चे सदस्य सुकेशिनी नाईकवाडे, विकास वाघमारे, प्रा. दासू वाघमारे, रानबा गायकवाड हेही उपस्थित होते. त्यांनी हा प्रकार थेट अंधश्रद्धा व अघोरी प्रथांचे जाहीर प्रदर्शन असल्याचे म्हटले असून, समाजात अशा प्रकारे अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ढगे यांच्या तक्रारीवरून दीपक देशमुख याच्यावर जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.